CMYK

सहावा सामना

राजस्थान रॉयल्स वि. कोलकाता नाईट रायडर्स

वेळ : ७.३० वा. स्थळ : गुवाहाटी

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



सोलापूर शहराचे तापमान

कमाल तपमान ३८.९

किमान तपमान २३.४

www.surajyadigital.com । बुधवार, दि. २६ मार्च २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १७६ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


# महाभयंकर : मानलेला भाऊ निघाला महागद्दार अन् विश्वासघातकी

# विवाहितेला प्रियकरासह नेऊन शरिराचे तोडले अक्षरश: लचके

## बार्शीचे हादरले समाजमन...अत्यंत किळसवाणी अन् निंदनीय धक्कादायक घटना उघडकीस...

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

**भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याला हरताळ फासून वासनेची भूक भागविण्यासाठी मानलेल्या ३४ वर्षीय बहिणीला तिच्या प्रियकरासह लॉजवर नेऊन आळीपाळीने शरिराचे लचके तोडत 'त्या' अभागी विवाहित महिलेची अब्रू लुटण्याचा महाभयंकर, अत्यंत संतापजनक अन् धक्कादायक प्रकार सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात बार्शी शहर हद्दीत घडला आहे. विवाहितेने वासनांधांना प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला तेव्हा, तिला कंबरेच्या पट्याने मारुन शांत करीत मानलेला भाऊ आणि प्रियकाराने वासनेची आग शमवली. यावेळी विवाहितेस जीवे मारण्याची धमकी या दोघांनी दिली. या महाभयानक घटनेने बार्शीचे समाजनमन अक्षरश: हादरले. त्या दोघा नराधमांनी जो प्रकार केला, त्याबद्दल संतापचा कडेलोट झाला.कानात शिशे ओतल्याप्रमाणे त्या नराधमांबद्दल संताप आल्याच्या प्रतिक्रिया येथील समाजमनातून उमटल्या.**



- अत्याचारी मानलेला भाऊ होता नशेत तर्र, त्यातच त्याने केले पाशवी कृत्य
- 'भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याला हरताळ फासले
- वासनेची भूक भागविण्यासाठी लॉजवर नेऊन कंबरेच्या बेल्टने मारहाण करत आळीपाळीने लुटली अब्रू
- जीव मारण्याची धमकी देऊन वासनेची आग शमवली

या अत्यंत गंभीर प्रकरणी शारिरीक आणि मानसिक त्रास असह्य झाल्याने पिडित विवाहित महिलेने अखेर बार्शी तालुका पोलीस ठाण्यात शनिवार (ता.२३) फिर्याद दिली. त्यावरुन प्रियकर सुरेश माळी आणि मानलेला भाऊ संतोष भानवसे या दोघा संशयितांविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ (बलात्कार), ३२३ (मारहाण), ५०६ (जिवे मारण्याची धमकी) आणि ३४ (सामूहिक कट) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संशयितांना बुधवार (ता.२६) पर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींची पीडित महिलेशी आधीपासून ओळख होती. याचाच गैरफायदा आरोपींनी घेतला. २२ डिसेंबर २०२४ रोजी शहरातील एका मंगल कार्यालयात विवाह सोहळा पार पडल्यानंतर आरोपींनी महिलेला घरी सोडतो असे सांगून गाडीत बसवले. गाडी घरी न नेता, आरोपींनी तिला कुर्डूवाडी रोडवरील एका लॉजमध्ये नेले. लॉजवर पोहचल्यानंतर महिलेला संशय आल्याने तिने विरोध केला. त्यावर आरोपींनी जीवे मारण्याची धमकी देत कंबरेच्या पट्ट्याने मारुन जबरदस्तीने जबरी शरीरसंबंध ठेवल्याचे फिर्यादीत नमूद आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक बालाजी वळसने करत आहेत.



संतोष भानवसे मानलेला भाऊ — सुरेश माळी प्रियकर (संशयित आरोपी)

### काही ठळक नोंदी...

- ✔ कमरेच्या पट्ट्याने मारझोड केल्याचे महिलेच्या सर्वांगावर व्रण
- ✔ बलात्काराचे पाशवी कृत्य करताना नराशम संशयित आरोपी संतोष भानवसे दारुच्या नशेत असल्याची पिडित महिलेची माहिती
- ✔ गुन्ह्यात वापरलेली गाडी आणि कमरेचा पट्टा जप्त
- ✔ पिडित महिलेची सोलापुरच्या सिव्हील हॉस्पीटलमध्ये झाली वैद्यकीय तपासणी
- ✔ पिडिता महिला आणि प्रियकर सुरेश माळी हे लिव्ह अॅन्ड रिलेशनशिपप्रमाणे होते राहात
- ✔ प्रियकर माळी याने संबंधित महिलेवर खूप पैसे खर्च केल्याचे तपासात आले पुढे

### लॉजमधील कर्मचाऱ्यामुळे सुटली बिचारी

पीडितेने विरोध केल्यानंतर आरोपींनी तिला कमरेच्या पट्ट्याने मारहाण केली. तसेच त्यांनी तिच्या कपड्यांची विटंबना करत किळसवाणे वर्तन केले. महिलेने मदतीसाठी आरडाओरड केली असता, लॉजचा कर्मचारी आवाज ऐकून घटनास्थळी धावला. त्याने दरवाजा उघडून महिलेची सुटका केली.

### दोघा नरधमांना पोलीस कोठडीची हवा

सुरेश परसू माळी व संतोष भास्कर भानवसे अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. या दोघांनाही अटक करून बार्शी न्यायालयात हजर करण्यात आले, त्यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. घटनेचा तपास सुरु आहे.

### अत्याचाराची परिसिमा गाठत वरुन पुन्हा धमकी

विवाहित महिलेवर दोघा नराधमांनी अत्याचार तर केलाच केला. बहिण-भावाच्या पवित्र नात्याचा अक्षरश: कोळसा केला. अत्यंत बहिणीच्या शरिराचे लचके तोडण्याचा अत्यंत निंदनीय अन् किळसवाणी प्रकार केला. एवढ्यावर न थांबलेल्या संतोष भास्कर भानवसे या मानलेल्या भावाने प्रियकर सुरेश परसू माळी याच्या मदतीने धमकी दिली. तू गावात राहायचे नाही. तू पुण्यात जाऊन राहायचे. जर पोलिसात तक्रार दिली तर तुला जिवंत सोडणार नाही.

### नराधमांच्या भितीपोटी पिडितेला तक्रार देण्यास उशीर

या प्रकारानंतर पीडितेला एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. दोन दिवस उपचार घेतल्यानंतर तिला डिस्चार्ज देण्यात आला. त्यानंतर आरोपींनी तिला तुळजापूर रोडवर नेऊन पोलिसांत तक्रार दिल्यास जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली. भीतीपोटी महिलेला तक्रार नोंदवता आली नाही. पण आरोपी पीडितेचा छळ करत राहिले.अखेर मानसिक आणि शारीरिक त्रास सहन न झाल्याने पीडितेनं २३ मार्च २०२५ रोजी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

**नेमकं काय घडलं? :** पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ३४ वर्षीय विवाहित पीडितेचा नवरा पुण्यामध्ये सेंट्रींग काम करतो, तर पिडित विवाहित महिला तीन महिन्यांपासून आपल्या मुलीसोबत बार्शीमध्ये राहते. सुरेश परसु माळी याच्यासोबत संबंधित पिडितेचे सुमारे सात वर्षांपासून प्रेमसंबंध होते. सुरेशचा मित्र संतोष भास्कर भानवसे हा विवाहितेला बहीण मानत होता. सुरेश माळी व संतोष भानवसे हे दोघे सप्टेंबर महिन्यात पुण्यातून पीडितेला बार्शीकडे न्यायला आले. त्यास पीडितेने नकार देताच सुरेशने तिला मारहाण केली होती. त्यानंतर पिडित विवाहित महिला बार्शीत आल्यावर संतोषने सांगितले की, तू माझी बहीण आहेस. तुझं सुरेश (विवाहितेचा प्रियकर) ऐकतो. त्यामुळे त्याच्या मुलीसोबत माझ्या मुलाचे लग्न जमवून दे. तेव्हा सुरेशशी बोलून त्याच्या मुलीचे संतोषच्या मुलाशी लग्न जुळवून दिले. दि. २२ डिसेंबर २०२४ रोजी पिडिता लग्नाला आली होती. लग्न झाल्यानंतर पीडितेचा पती जास्त दारूच्या नशेत असल्याने त्याला सुरेश माळी व संतोष भानवसे यांनी वऱ्हाडाच्या गाडीत पाठवून दिले. त्यानंतर रात्री साडे अकराच्या सुमारास या दोघांनी मिळून पिडितेस 'चल तुला घरी तुझ्या गावी घेऊन जातो' असे म्हणून सुरेश माळी याने त्याच्या स्वीफ्ट गाडीमध्ये बसवून कुर्डुवाडी रस्त्यावरच्या लॉजवर नेले. तिथे सुरेश माळी आणि संतोष भानवसे यांनी आळीपाळीने महिलेवर जबरी अत्याचार केला.

## कुंभारी येथील विहिरीत मृतदेह

✔ **सोलापूर :** नवीन विडी घरकुल कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथील अल्लापक्ष बागवान यांच्या शेतातील विहिरीत एका ३४ वर्षीय इसमाचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला. ही घटना सोमवारी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास उघडकीस आली. कुंभारी येथे बागवान यांच्या शेतातील विहीरीत सोमय्या आगय्या वंगारी (वय ३४, रा.अविभाग घरकुल कुंभारी) याचा मुक्तता पाण्यावर तरंगताना आढळून आला. वळसांच्या पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शासकिय रुग्णालयाकडे पाठवून दिले.


## सोलापूर बाजार समिती निवडणूक

# ४३१ अर्जांची विक्री; हसापुरेंनी भरले दोन अर्ज

✔ सोलापूर/प्रतिनिधी

उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर मंगळवारपासून सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या १८ संचालक मंडळासाठी निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. एकूण आतापर्यंत ४३१ अर्जांची विक्री झाली. त्यापैकी १८१ अर्ज विक्री यापूर्वीच झाली होती. मंगळवारी २५० अर्जांची विक्री झाली. ११ उमेदवारी अर्ज सादर झाले. सुरेश हसापुरे यांनी दोन गटातून अर्ज दाखल केले.

बाजार समिती निवडणुकीसाठी शुक्रवार, २८ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशन करता येणार आहे. निनवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांच्यावर जबाबदारी असणार आहे. यापूर्वी पहिल्या दिवशी १८१ अर्जांची विक्री झाली होती. मंगळवारपासून पुन्हा अर्ज विक्री आणि स्वीकृती सुरू झाली




आहे. सर्व साधारण उमेदवारासाठी ५ हजार तर राखीवसाठी हजार रुपये अनामत रक्कम आहे. २०० रुपये अर्ज फी आहे. अर्ज दाखल करण्यासाठी फक्त चार दिवसांची मुदत राहणार आहे. यंदाच्या निवडणुकीसाठी ५ हजार ४३१ जणांना मतदानासाठी पात्र ठरविण्यात आले आहेत.

दाखल होणाऱ्या अर्जांची छाननी २ एप्रिल रोजी सकाळी ११.३० वाजल्यापासून सुरू होणार आहे. उमेदवारी अर्ज माघारीसाठी १६ एप्रिल मुदत आहे. निवडणूक लढणाऱ्या उमेदवारांची यादी व निवडणूक चिन्हांचे वाटप १७ एप्रिलला होणार आहे. बाजार समितीसाठी २७ एप्रिल रोजी मतदान व २८ एप्रिल रोजी मतमोजणी होणार आहे.

# अनगरचे अप्पर तहसील कार्यालय अखेर रद्द!

## अधिवेशनातील शासन निर्णयाने झाले शिक्कामोर्तब

✔ मोहोळ/प्रतिनिधी

**मागील वर्षभरापासून मोहोळ तालुक्यातील अनगर येथील अप्पर तहसील कार्यालयाचा वाद चव्हाट्यावर आला होता. सत्तेच्या जोरावर चालू केलेले हे कार्यालय उच्च न्यायालयाने रद्द करण्याचा निकाल दिला होता. तरीही त्या ठिकाणी कार्यालय सुरूच होते. याबाबत आ. राजू खरे यांच्याकडे जनतेच्या तक्रारी सुरूच होत्या. याच निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आ. खरे सातत्याने पाठपुरावा करित होते. सरकारने राज्यपालांच्या आदेशानुसार हे अप्पर तहसील कार्यालय रद्द केल्याचा शासन निर्णय अखेर मंगळवार, २५ मार्च रोजी काढला. यामुळे अनगर येथील नव्याने सुरू केलेले ते अप्पर तहसील रद्दबाबत शिक्कामोर्तब झाले आहे.**

मोहोळ याठिकाणी एकच तहसील कार्यालय होते. मोहोळ हे अवघ्या तालुक्याचे मध्यवर्ती ठिकाण होते. तरीही माजी आमदार यशवंत माने यांच्या कार्यकाळामध्ये अनगर येथे विनाकारण अप्पर तहसील कार्यालय उघडण्यात आले होते. या कार्यालयामुळे बहुतांशी लोकांना त्रासदायक वाटत होते. त्यामुळे सदरचे अपर तहसील कार्यालय करण्याबाबत तमाम जनतेचा विरोध दिसत होता. हा विरोध झुगारून अनगर येथील अप्पर तहसील कार्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यामुळे मोहोळ तालुक्यात मोठा राजकीय वाद भेटला होता.

याविरोधात मोहोळ तालुक्यातील काही जणांनी जनहित याचिका दाखल केली होती. या याचिकेवर निकाल देताना माननीय उच्च न्यायालयने १७फेब्रुवारी रोजी अप्पर तहसील कार्यालयास मंजुरी देण्यात आलेला शासन निर्णय रद्द चा आदेश दिला होता. या दिलेल्या न्याय निर्णयास अनुसरून मंगळवार, २५ मार्च रोजी नव्याने शासन निर्णय काढण्यात आला.

हा शासन निर्णय राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार सहसचिव सत्यनारायण बजाज यांनी पारित केला आहे. या निर्णयाच्या प्रती राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमत्री, महसूल मंत्री, आणि यासंबंधात असलेले सर्व अधिकारी यांच्या कार्यालयांना देण्यात आले आहेत.

### आ. राजू खरे यांनी दिलेले आश्वासन पूर्ण

अनगर येथील अप्पर कार्यालयास सुरुवातीपासूनच आमदार राजू खरे यांनी विरोध दर्शविला होता. त्याचे पडसाद म्हणून मोहोळ तालुक्यातील जनतेने विधानसभा निवडणुकीतील चक्क सत्तांतर घडवून आणले होते. आ. खरे यांनाही निवडणुकीत दिलेला शब्द पुर्ण करण्यासाठी मोठी घाई झाली होती. त्यांनी उच्च न्यायालयाचा निकाल येताच, ७ मार्च रोजी अनगरचे अप्पर तहसील कार्यालय रद्द करून पूर्ववत मोहोळ या ठिकाणी एकाच ठिकाणी तहसील कार्यालय ठेवण्याबाबतचे निवेदन सादर केले होते. याची दखल घेत, अधिवेशन दरम्यानच हा नवीन शासन निर्णय काढण्यात आला आहे. यामुळे आ. राजू खरे यांनी दिलेले आश्वासन खऱ्या अर्थाने परिपूर्ण झाले आहे.



आ.राजू खरे

# पिकअपच्या धडकेने पती-पत्नी जागीच ठार

### मुलगा गंभीर जखमी; सांगोल्या जवळील घटना

✔ सांगोला/प्रतिनिधी

मोटार सायकलला समोरून येणाऱ्या पिकअप वाहनाने धडक दिल्याने पती-पत्नी जागीच ठार झाले तर त्यांचा मुलगा जखमी झाला. हा अपघात सांगोला ते शिरभावी मार्गावर बेहेरे चिंचोली जवळील पेट्रोल पंपाजवळ मंगळवारी सकाळी घडला. धनंजय तुकाराम क्षीरसागर (वय ५०), सुवर्णा क्षीरसागर (वय ४४) अशी ठार झालेल्यांची नावे आहेत मुलगा ब्रह्म (वय १४) हा गंभीर जखमी झाला.

धनंजय क्षीरसागर हे शिरभावी येथील असून तेथील महाराष्ट्र बँकेत रोखपाल म्हणून सेवेत होते. ते सहा महिन्यापूर्वी सांगोला येथे राहण्यासाठी गेले होते. धनंजय यांची एक मुलगी वैष्णवी ही कोल्हापूर येथे एलएलबी तर दुसरी मुलगी ऋतुजा ही पुणे येथे इंजिनिअरिंग शिक्षण घेत असून तिसरी मुलगी प्रतीक्षा ही शिरभावी येते राहत होती. ब्रह्म हा मुलगा आठवी येथे शिरभावी गावातच शिकत आहे. धनंजय हे सांगोला राहण्यासाठी गेल्याने ते दररोज मुलगा, पत्नी सोबत सकाळी साडेसात वाजता शिरभावीला मोटर सायकल वरून जाण्यासाठी निघत होते.

मंगळवारी नेहमीप्रमाणे सकाळी साडेसात वाजता ते निघाले. सांगोल्यापासून आठ किलोमीटर अंतरावर बेहरे चिंचोलीच्या पुढे पेट्रोल पंपाजवळ सुसाट वेगाने येणाऱ्या पिकपने धडक दिल्याने धनंजय व पत्नी सुवर्णा हे गाडीवरून उडून हे वेगवेगळ्या ठिकाणी पडल्याने गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाले. मुलगा ब्रह्म हा ही उडून रस्त्यावर पडून रक्ताच्या थारोळ्यात गंभीर जखमी होऊन पडला. त्यास नागरिकांनी त्वरित उचलून सांगोला येथील खासगी दवाखान्यात नेले प्रथमोपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी त्यास मिरजेला नेण्यात आले. त्याची प्रकृती स्थिर आहे. पती-पत्नीवर त्यांना शिरभावी येथील स्मशानभूमी सायंकाळी सहाच्या सुमारास त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



धनंजय सुवर्णा क्षीरसागर पती-पत्नी

### कुटुंब झाले पोरके

धनंजय यांच्या पश्चात तीन मुली, एक मुलगा, आई, भाऊ, वहिनी असा परिवार आहे. ते सर्व शिरभावी येथेच राहतात. क्षीरसागर पती-पत्नीच्या निधनानंतर आता त्यांचे कुटुंब पोरके झाले आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



'सिटी बस' धावून धावून रस्त्यांची ही अवस्था' झाली!


कल्याण 677-00-334

मुंबई 457-67-890


CMYK